संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# नोकऱ्या नसताना बड्या पदांची घाऊक निर्मिती

केंद्र सरकारने आर्थिक निकषावर दहा टक्के आरक्षण देण्याची घोषणा केली. या घोषणेमुळे समाजातल्या काही विशिष्ट वर्गाला मोठा दिलासा मिळेल अशी सत्ताधारी पक्षाची समजूत दिसते. परंतु आरक्षणाची सध्याची परिस्थिती आणि देशात उपलब्ध नोकऱ्या याचे प्रमाण प्रचंड व्यस्त आहे. आरक्षण दिल्यानंतरही नोकऱ्या कुठून आणायच्या असे प्रश्न सत्ताधारी पक्षाच्याच अनेक नेत्यांनी उपस्थित केले आहेत. तर दुसरीकडे सरकारची धोरणेच इतकी परस्पर विरुध्द दिसून येतात. त्यामधून नोकऱ्या उपलब्ध करून देण्याबाबत सरकारच गंभीर नाही असे वाटायला लागते. महाराष्ट्रात सामान्य प्रशासन विभागामध्ये नोकरभरतीचे फर्मान काढले गेले. सत्तर हजार जागा भरल्या जातील अशीही घोषणा झाली. पण उच्च श्रेणीतील पदे जर रिक्तच झाली नाहीत. तर पदोन्नत्या आणि त्याप्रमाणात नोकरभरती होऊ शकत नाही. आज महाराष्ट्र सरकारची अशीच धोरणे दिसून येतात. विशेषतः निवृत्त होणाऱ्या अधिकाऱ्यांना पुन्हा मुदतवाढ देण्याचे आणि अनेकांना मुदतवाढ दिल्यानंतरही कुठे ना कुठे सामावून घेण्याचे म्हणजेच त्यांच्यावर सरकारी कृपा करण्याचे प्रकार उघडपणे सुरु आहेत. गेल्या वर्षभरात अशा अनेक पदांवर त्याच त्या अधिकाऱ्यांना एकतर मुदतवाढ दिली गेली आणि नंतर काही स्वतंत्र पदे निर्माण करून सरकारी पैशांचा गैरवापरही केला गेला. नोकऱ्या नसताना नवीन पदे निर्माण करण्याचा आणि आपल्या मर्जीतल्या अधिकाऱ्यांना ती पदे बहाल करण्याचा हा प्रकार अक्षरशः मनमानी स्वरुपाचाच म्हणावा लागतो. गेल्या महिन्याभरापासून राज्याचे पोलिस महासंचालक दत्ता पडसलगीकर यांना मुदतवाढ देण्याचा प्रश्न चर्चेमध्ये आहे. गेल्या वर्षी ३१ ऑगस्टला निवृत्त होणाऱ्या पडसलगीकरांना तीन महिन्यांची अतिरिक्त मुदतवाढ दिली गेली. ती संपल्यानंतर पुन्हा तीन महिन्यांची मुदतवाढ मिळाली. परंतु आता त्यांना २०२० पर्यंत मुदतवाढ देण्याचा सरकारचा आटापीटा चालू आहे. कायदा जर सगळ्यांसाठी समान असतो तर मग पोलिस खात्यातील नियुक्त्यांबाबतही तो तसाच असला पाहिजे. परंतु आपल्या सोयीसाठी कायद्याचीही तोडमोड केली जाते. हे या प्रकारातून दिसून येते.

### सामान्य नोकरीच्या प्रतिक्षेत

या प्रकारानंतर मुख्य सचिव असलेल्या सुमित मुलिक यांना निवृत्तीनंतर लागलीच मुख्य माहिती आयुक्त म्हणून नेमले गेले. सार्वजनिक बांधकाम खात्यात अतिरिक्त मुख्याधिकारी असलेल्या आनंद कुलकर्णी यांनादेखील निवृत्तीनंतर राज्य वीज नियामक प्राधिकरणाचे मुख्य म्हणून नेमले गेले. विजय सतबिर सिंग या माजी आरोग्य सचिवांना निवृत्तीनंतर गृहनिर्माण प्राधिकरणाच्या सदस्यपदी विराजमान केले गेले. तर एस. एस. संधू या माजी सहकार सचिवांना महारेराचे सदस्य म्हणून यांची वर्णी लावली गेली. त्यापाठोपाठ आता गृहविभागाचे अतिरिक्त सचिव म्हणून ३१ डिसेंबरला निवृत्त झालेल्या सुनिल पोरवाल यांना अत्यंत वेगाने हालचाली करून कोकण विभागाचे माहिती आयुक्त म्हणून नियुक्त केले गेले. याचा अर्थ ही सगळी पदे निवृत्त झालेल्यांच्या झोळीत टाकण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केलेला दिसून येतो. खरे तर ही सगळी पदे थेट भरता येऊ शकतात आणि अनेकांना चांगल्या नोकऱ्या उपलब्ध होऊ शकतात. ही केवळ परवानगीदाखल काही उदाहरणे दिली आहेत. पण आज प्रत्येक खात्यामध्ये सरासरी चार ते पाच अधिकाऱ्यांना मुदतवाढ देणे किंवा काहीतरी नवी पदे निर्माण करून त्यांची सेवा चालू ठेवण्याचा कटकारस्थानी प्रयोग दिसून येतो. वर्षभरातून अगदीच प्रशासनाची अडचण होऊ नये किंवा नाईलाज म्हणून एखाददोन पदांना थोड्या कालावधीसाठी मुदतवाढ देणे हे समजून घेता येऊ शकेल. परंतु खंडीभर पदांसाठी मुदतवाढ दिली जाते. तेव्हा सरकारकडे या अधिकाऱ्यांच्या पगारांवर उधळायला बख्खळ पैसा आहे असेच म्हणावे लागते. मुळातच आयएएस किंवा सनदी अधिकारी हे जसे निवृत्तीकडे झुकतात त्याचवेळी त्यांचे निवृत्तीनंतरच्या पदांबाबतचे आडाखे सुरु होतात. पुढच्या दोन तीन वर्षात आपली आपण कुठे वर्णी लावून घेऊ शकू याची ते व्यूहरचनाही करतात. सत्ताधारी पक्षातल्या वजनदार नेत्यांचे लांगुलचालन करून आपल्या पदाला अनुकूल वातावरण निर्माण करण्यात ते यशस्वीही होतात. त्यांच्यावर केलेल्या या कृपेचा राज्यातील जनतेला प्रत्यक्षपणे कोणताही फायदा होत नाही कारण निवृत्तीनंतरचे हे पद म्हणजे उत्पन्न चालू ठेवून सरकारी यंत्रणेचा वापर करून घेण्यासाठी केलेला निगरगट्ट प्रयत्न असतो. आतापर्यंत अशी अनेक पदे मर्जीतल्या अधिकाऱ्यांना बहाल केली गेली. परंतु कोणीही अद्वितीय काम करून दाखवलेले नाही.

### सर्वांचेच मौन

आमचे म्हणणे एवढेच आहे की, एकीकडे राज्यातील सामान्य तरुण नोकरीच्या शोधात असतो. आरक्षणाच्या माध्यमातून आपल्याला आज ना उद्या सरकारी नोकरी मिळेल अशा आशा तो जागवित असतो. पण दुसरीकडे प्रशासनातली विशिष्ट चौकडी बड्या पदांचे दान मिळवून मालामाल होत असतात. अशा पदांचा जर काटेकोरपणे हिशोब केला तर संपूर्ण राज्यात मुदतवाढ किंवा निवृत्तीनंतरची पदे मिळवलेल्या हजार ते पंधराशे नोकऱ्या सापडतील. याच ठिकाणी जर त्या नियंत्रित केल्या आणि या अधिकाऱ्यांना वेळच्यावेळी घरी पाठवले तर त्याचा लाभ खऱ्या अर्थाने गरजू लोकांना होऊ शकेल. महाराष्ट्रात इतक्या मोठ्या प्रमाणावर बड्या पदांची लयलूट सुरु असताना कोणीही त्याविरुध्द बोलताना दिसून येत नाही. अगदी कर्मचारी संघटनांकडून आक्षेप घेतला जात नाही. अनेकवेळेला नको त्या विषयांवर गदारोळ करणारा विरोधी पक्षसुध्दा अशा घाऊक नियुक्त्यांबाबत मौन बाळगून राहतो याचेही आश्चर्य वाटते. खरे तर अशा नियुक्त्या करण्याबाबत कायमस्वरुपी धोरण आखले गेले पाहिजे. सरकारच्या किंवा केवळ मुख्यमंत्र्यांच्या मर्जीप्रमाणे अशी मुदतवाढ किंवा नव्या पदांची नियुक्ती करण्याचे प्रकार थांबवण्याची गरज आहे.